## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 17.03.2020.

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे व त्यांचे भावाचे नाव 7/12 वरुन कमी केले होते, ते परत लावण्यासाठी व पुर्वीचे चुकीचे पत्रक देण्यात आले होते, तेव्हा तक्रारदार यांचे कडुन आलोसे श्री. राम मुरकुटे लिपीक यांनी 500/- रुपये घेतले होते, परंतु पुन्हा तेच पत्रक दुरुस्ती करुन देण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदाराकडे 1,000/- रुपयांची लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 17.03.2020 रोजी सापळा लावला असता लोकसेवक श्री. राम रघुनाथ मुरकुटे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी लिपीक, तहसिल कार्यालय सोयगाव ता सोयगाव जि औरंगाबाद यांनी स्वत: पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने तहसिल कार्यालय, सोयगाव जि औरंगाबाद येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. राम रघुनाथ मुरकुटे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी लिपीक, तहसिल कार्यालय सोयगाव ता सोयगाव जि औरंगाबाद यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.